पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक-नस/१०/कावि/५४/२०१७
दिनांक - २४ /०७/२०१७

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्यालयातील पहिल्या मजल्यावरील स्व.यशवंतराव चव्हाण सभागृह आणि तिस-या मजल्यावरील स्व.मधुकरराव पवळे सभागृहाचे वापराबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(१) स्व.यशवंतराव चव्हाण सभागृहाचा वापर फक्त मा.महापालिका सभांचे आयोजन करण्याकरिता करण्यात यावा. क्वचित प्रसंगी मा.महापालिका सभेव्यतिरिक्त सन्मा.नगरसदस्यांचे बैठकीकरिता किंवा मनपाचे इतर विभागाकडील महत्वाचे कार्यक्रमाकरिता स्व.यशवंतराव चव्हाण सभागृह उपलब्ध करुन देणेकरिता मा.महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील व अशा प्रकारे परवानगी प्राप्त झालेल्या पत्राची प्रत अशा विशिष्ट कार्यक्रमापूर्वी सुरक्षा विभागाकडे सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर सुरक्षा विभागामार्फत स्व.यशवंतराव चव्हाण सभागृहाची चावी संबंधित विभागाकडील कर्मचा-याकडे देणेत येईल.

खाजगी कार्यक्रमाकरिता इतर व्यक्ती अथवा संस्था यांना स्व.यशवंतराव चव्हाण सभागृह उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

(२) स्व.मधुकरराव पवळे सभागृहाचा वापर प्रामुख्याने मा.स्थायी समिती सभा, मा.विशेष समित्यांच्या सभा, मा.विशेष समित्या/मा.प्रभाग समित्यांचे अध्यक्ष/उपाध्यक्ष निवडणूका, विभाग प्रमुखांची बैठक, कर्मचारी निवृत्तीचा कार्यक्रम इ. करिता करता येईल. याकरिता संबंधित विभागाकडील पत्र किंवा नगरसचिव विभागाकडील सभेची कार्यक्रमपत्रिका सुरक्षा विभागास बैठकीपूर्वी देणे आवश्यक राहील. या व्यतिरिक्त इतर विभागाचे समन्वयाने महत्वाचे कार्यक्रमाकरिता स्व.मधुकरराव पवळे सभागृहाचा वापर करणेकरिता मा.सभापती, स्थायी समिती यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील व अशा प्रकारे परवानगी प्राप्त झालेल्या पत्राची प्रत कार्यक्रमापूर्वी सुरक्षा विभागाकडे सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर सुरक्षा विभागामार्फत स्व.मधुकरराव पवळे सभागृहाची चावी संबंधित विभागाचे कर्मचा-याकडे देणेत येईल.

खाजगी कार्यक्रमाकरिता इतर व्यक्ती किंवा संस्था यांना स्व.मधुकरराव पवळे सभागृह उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

तसेच सार्वजनिक निवडणूकीनंतर मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षांचे गटनेता/विरोधी पक्षनेता यांना त्यांचे पक्षाचे नगरसदस्य यांची बैठक घेणेकरिता दुस-या मजल्यावरील पूर्वीचे जैव विविधता समितीकरिता उपलब्ध करुन दिलेले कार्यालय उपलब्ध करुन देण्यात यावे. याकरिता मा.गटनेता यांनी नगरसचिव कार्यालयाकडे मागणी पत्रे दिल्यानंतर प्रथम प्राप्त झालेल्या पत्रानुसार प्राधान्य क्रमाने सदर कार्यालय उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे नगरसचिव विभागाकडून सुरक्षा विभागास कळविण्यात यावे व त्यानंतर सुरक्षा विभागाकडून संबंधितांस कार्यालयाची चावी उपलब्ध करुन देणेत यावी.

स्व.यशवंतराव सभागृह आणि स्व.मधुकरराव पवळे या दोन्ही सभागृहाचा वापर वर नमूद बाबींकरिताच होईल याची सर्व विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

सुरक्षेच्या दृष्टिकोणातून सदर सभागृहांचा ताबा हा पूर्वीप्रमाणे सुरक्षा विभागाकडेच राहील. सभागृहांच्या चाव्या या देखील सुरक्षा विभागाचे ताब्यात राहतील. मा.महापालिका सभा, मा.स्थायी समिती व मा.विशेष समित्यांचे सभांकरीता कार्यपत्रिकेची आगावू प्रत सुरक्षा विभागाकडे देणेत यावी. व मा.महापौर व मा.सभापती स्थायी समिती यांचे पूर्वपरवानगीने आयोजित करावयाच्या विशेष कार्यक्रमांबाबत मा.पदाधिकारी यांचे पूर्वमान्यतेच्या पत्राची प्रत सुरक्षा विभागाकडे कार्यक्रमापूर्वी देणेत यावी. त्यानंतरच सुरक्षा विभागामार्फत संबंधित विभागाचे कर्मचा-याकडे सभागृहाची चावी देणेत यावी.

वरील कार्यपद्धतीप्रमाणे सभागृहांचा वापर होईल याबाबत विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी. सभागृहांचा परस्पर वापर केल्याने वाद उद्भवल्यास त्याकरिता संबंधित विभागप्रमुख जबाबदार राहील याची नोंद घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रति,

१) नगरसचिव विभाग,

२) सुरक्षा विभाग

यांजकडेस योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर...

प्रत –

१) स्वीय सहाय्यक, मा.महापौर,

२) स्वीय सहाय्यक, मा.सभागृह नेता,

३) स्वीय सहाय्यक, मा.स्थायी समिती,

४) स्वीय सहाय्यक, मा.विरोधी पक्षनेता

यांजकडेस माहीतीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर...

प्रत –

१) मा.आयुक्त कक्ष

यांजकडेस माहीतीस्तव सादर...